# कपाटातला प्राणी

धाड! धाड! धाड!



राजूनी डोळे किलकिले करून पहिले आणि पांघरूण ओढून चेहऱ्यावर घेतले. कपाटातून पुन्हा आवाज आला. आतून दारावर कोणीतरी धडक देत होते.

"कोण आहे तिथे?" राजूने थरथरत्या आवाजात विचारले.

हळूहळू दार उघडायला लागले. राजूने पलंगावरून उडी मारली. पळत जाऊन त्याने कपाटाचे दार धाडकन बंद केले. त्याने खुर्ची ओढून दारापुढे आणून ठेवली. राजू पळत खोलीच्या बाहेर गेला. सरळ त्याच्या दादाच्या खोलीत जाऊन राजू त्याच्या पांघरूणात घुसला.

"राजू, तू इथे काय करतोयस?" दादाने डोळे चोळत विचारले.

"माझ्या कपाटात कोणीतरी आहे." राजूने दादाचा हात ओढत सांगितले.

"तुला स्वप्न पडले असेल. जा परत जाऊन झोप." दादा म्हणाला.

"नाही. नाही. मी जागा होतो. कपाटातून आवाज येत होता. आणि दार सुद्धा उघडायला लागले." राजूने आता दादाचे पांघरूण ओढले.

"ठीक आहे, मी येतो. पण जर का कपाटात काही नसेल, तर मग मला नंतर त्रास द्यायचा नाही." दादाने राजूला बजावले.

राजू आणि दादा त्याच्या खोलीत गेले. कपाटातून आवाज येतच होता. दादानी पांघरूण हातात घेतले. तो राजूला म्हणाला, "तू कपाट उघड. मी त्या प्राण्याला पकडतो."

राजूनी खुर्ची बाजूला करून हळूच दार उघडले. कुठलातरी केसाळ प्राणी बाहेर आला. दादानी पटकन त्याला पांघरूणात पकडले.

राजूने खोलीतला दिवा लावला. पाहतात तर काय, दादाच्या हातात होती त्यांची मांजर - मनी!

दादा हसायला लागला. "बिचारी मनी! तुझ्या कपाटात अडकली - तुझ्या वास येणाऱ्या बुटाबरोबर! बाहेर येण्यासाठी धडपड करणारच ना?"

"बिचारी मनी! माझ्यापेक्षा तूच जास्ती घाबरली असशील." राजू म्हणाला.

~ केली हशवे (अनुवाद: सुजित उपाध्ये)
त्रिवेणी मराठी शाळा

१. या गोष्टीतली मुख्य पात्रे कोणती आहेत? प्रत्येकाची एका वाक्यात माहिती द्या.

______________________________

______________________________

२. ही गोष्ट कुठे घडली आहे?

______________________________

______________________________

३. मुख्य पात्राची अडचण काय आहे?

४. ती अडचण कशी सोडवली?

५. दादा कसा आहे? का?  (दोन विशेषणे लिहा.)

------------------- कारण... -----------------------------------------------------------------

------------------- कारण... -----------------------------------------------------------------

६. तुम्हाला ही गोष्ट आवडली का नाही? का?